SF महाराष्ट्र एक्सप्रेस दैनिक
महाराष्ट्र राज्य • देश • समाज • उद्योग • शिक्षण • विकास
संपादक
संतोष श्रीधर फुंदे
मोबाईल : 8888623177
epaper.sfmaharashtraexpress.in
वर्ष : १ | पुणे | बुधवार, ७ ऑक्टोबर २०२६ | | किंमत : रु ५/-

भोर-मुळशी-राजगड मतदारसंघातील २५ रस्त्यांसाठी ३२४ कोटींची तरतूद!

११४ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचा होणार विकास; डिसेंबर २०२६ अखेर कामे पूर्ण करण्याचे नियोजन



मुळशी | प्रतिनिधी – संदीप बडे

भोर-मुळशी-राजगड विधानसभा मतदारसंघातील रस्ते विकासाला मोठी गती मिळणार असून, पुणे ग्रँड टूर २०२७ अंतर्गत मतदारसंघातील तब्बल २५ रस्त्यांच्या कामांसाठी ३२४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. सार्बजनिक बांधकाम विभाग तसेच पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून सुमारे ११४ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचा विकास केला जाणार असल्यांची माहिती आमदार शंकर मांडेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री व पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा निधी उपलब्ध झाल्यांचे आमदार मांडेकर यांनी सांगितले.

पत्रकार परिषदेला मान्यवरांची उपस्थिती

या पत्रकार परिषदेला जिल्हा परिषद सदस्य विक्रम खुटवड, राजगड राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष किरण राऊत, माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत बाठे, भोर पंचायत समितीचे उपसभापती विशाल कोंडे, राजगड पंचायत समितीचे उपसभापती संदीप खुटवड, मुळशी तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेसचे उपाध्यक्ष बावाजी शेळके यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

पुणे ग्रँड टूर २०२७

रस्ते विकासाला मिळाली भरीव गती



मुळशी तालुक्यातील रस्त्यांना प्राधान्य

मुळशी तालुक्यातील विविध रस्त्यांच्या विकासकामांचा समावेश असून, घोटावडे फाटा–मुठा, मुठा–कोंढूर, टायगर पॉइंट–आंबवणे, घोटावडे-फाटा–भरे, कोंढूर फाटा–जांभळी, आहेरवाडी–निवे, मोसे–बेबटमाळ, बेबटमाळ–पळसे, पळसे–दासवे, दासवे–मुगाव, मुगाव–ताम्हिणी, आंबवणे–तेलबैल, तेलबैल–बारर्प तसेच बार्पे खुर्द–आहेरवाडी या मार्गांचा समावेश आहे.

राजगड व भोर तालुक्यातील रस्त्यांचाही विकास

राजगड तालुक्यातील मार्गगसणी–पाबे फाटा, पाबे फाटा–वेल्हे, पाल खिंड–खरीव गाव, जांभळी–पानशेत, पानशेत–साई बु.–मोसे आदी रस्त्यांचा विकास केला जाणार आहे.

भोर तालुक्यातील माळबाडी–जोगवडी, जोगवडी–कांबरे, कांबरे–कुरुंजी, कुरुंजी–डेरे, डेरे–खुळशी आणि खुळशी–पाल खिंड या रस्त्यांच्या सुधारणांनाही मंजुरी मिळाली आहे.

निविदा प्रक्रिया पूर्ण; कामे सुरू

या सर्व रस्त्यांच्या कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून काही ठिकाणी प्रत्यक्ष कामांनाही सुरुवात झाली आहे. डिसेंबर २०२६ अखेरपर्यंत सर्व रस्त्यांची कामे पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे आमदार शंकर मांडेकर यांनी सांगितले.

पुणे ग्रँड टूर २०२७च्या माध्यमातून मतदारसंघातील रस्ते विकासासाठी भरीव निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आमदार शंकर मांडेकर यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री तसेच संबंधित विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे आभार मानले.